# SAKAL TODAY

**DATED: Wednesday, 11 April 2007**

# साहसी, जिद्दी विदुल बनणार 'रणरागिणी'

**पुणे, ता. १०** : निश्चयाच्या जोरावर सैन्यदलातील प्रवेशापर्यंत युवतीही वाटचाल करू शकतात, हे येथील विदुल किशोर दाभाडे हिने दाखवून दिले आहे. येथील तुळशीबाग भागात राहणाऱ्या विदुलचे वडील व्यापारी आहेत. घरात कोणीही सैन्य दलाशी संबंधित नसताना विदुलला एनसीसीमुळे झुंजार वृत्तीची गोडी लागली. भारतीय सैन्य दलातील महिला विशेष प्रवेश योजनेअंतर्गत तिची निवड झाली आहे. येत्या आठवड्यात चेन्नईतील 'ऑफिसर्स ट्रेनिंग अॅकेडमी'मध्ये ती सहा महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी रुजू होणार आहे. त्यानंतर 'लेफ्टनंट' (कमिशन्ड ऑफिसर) म्हणून सैन्य दलात तिची नेमणूक होईल. या निवडीसाठी लेफ्टनंट कर्नल प्रदीप ब्राह्मणकर यांच्या मार्गदर्शनात तिने अभ्यास केला.

विदुलने शालेय शिक्षण नूमविमध्ये, अकरावी-बारावीचे स. प. महाविद्यालयात व पदवीसाठीचे शिक्षण सिंबायॉसिस महाविद्यालयात घेतले. अवघी १० वर्षांची असताना पुणे ते प्रतापगड ही १३८ कि.मी. अंतराची अश्वारोहण मोहीम तिने ११ तास व ७ मिनिटांमध्ये पूर्ण केल्यामुळे लिम्का बुक या जागतिक विक्रमांची नोंद करणाऱ्या पुस्तकात तिचे नाव झळकले होते. एवढ्या कमी वयात केलेला हा विक्रम आजवर अबाधित आहे. महाविद्यालयात असताना ३



महाराष्ट्र एअर स्क्वाड्रन एनसीसीची ती विद्यार्थिनी होती. अखिल भारतीय वायुसैनिक छावणीत 'मायक्रोलाइट वैमानिक' म्हणून तिने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. नेव्हल विंग एनसीसीतर्फे आयोजित स्कूबा डायव्हिंग स्पर्धेत तिने उत्कृष्टता पारितोषिक पटकावले. २००६ मध्ये ऑस्ट्रेलियात झालेल्या जागतिक जीवरक्षण स्पर्धेत तिने भारताचे प्रतिनिधित्व केले.

येथील 'हिराबेन नानावटी मॅनेजमेंट' संस्थेत एमबीए प्रथम वर्षाचे शिक्षण घेत असतानाच तिला ही संधी मिळाली आहे. याबद्दलचे श्रेय आई, वडील, मित्र परिवार व ब्राह्मणकर यांना ती देते. तिच्या शब्दांत, "देशासाठी स्वतःची सर्वोत्तम कौशल्ये उपयोगात आणायची संधी मला मिळते आहे. प्रामाणिकतेने प्रत्येक काम करण्याचे शिक्षण आई किशोरीने दिले. इतर युवतींनी देशाच्या संरक्षणासाठी पुढाकार घ्यावा, यासाठी मी सतत प्रयत्नशील राहीन." विदुलचे 'युवा सकाळ'मध्ये महाविद्यालयीन प्रतिनिधी म्हणून बरेच लेख प्रकाशित झालेले आहेत.